
Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308
December-2021
ISSUE No- (CCCXXXIII) 333



# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

# वैदर्भीय साहित्यधारा

## शोधनिबंध विशेषांक

२०२१

- संपादक -

डॉ. अजय चिकाटे

डॉ. विजय राऊत

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | मुक्तिबोधांची दीर्घ कविता — डॉ.कोमल वि. ठाकरे | 1 |
| 2 | वैदर्भीय प्रजाप्रिय प्रथम राज्यकर्ती—नागनिका — डॉ.गणेश चव्हाण | 8 |
| 3 | राष्ट्रसंताच्या पोवाडयातील ग्रामोध्दाराची सुत्रे — डॉ. प्रवीण कारंजकर | 11 |
| 4 | रवींद्र शोभणे यांच्या दोन कादंबऱ्या — प्रा.डॉ.अनिल बोपचे | 16 |
| 5 | वैदर्भीय कथाकार: सदानंद देशमुख — डॉ.प्रवीण घारपुरे | 20 |
| 6 | ग्रामीण कादंबरी: स्वरूप आणि आशय — डॉ. सुधीर बब्रुवान मोरे | 24 |
| 7 | यशवंत मनोहर यांच्या जीवनायन आणि वामन निंबाळकर यांच्या महायुध्द या काव्यसंग्रहातील आशयाचे वेगळेपण — प्रा. डॉ. प्रशांत रामदासजी राऊत | 28 |
| 8 | कुसुमावती देशपांडे यांचे ललित निबंध लेखन — डॉ. मंगला डाहाट | 33 |
| 9 | वैदर्भीय स्त्रीचे नेतृत्वकरणारी 'धग' कादंबरीतील कौतिक — प्रा. सतीश एस.कर्णासे | 38 |
| 10 | झाडीपट्टीतील 'बहिणाबाई' : कवयित्री अंजनाबाई खुणे — डॉ.पद्माकर डिगांबर वानखडे | 42 |
| 11 | 'आकांत' कारबाबाराव मडावी - एक परिवर्तनवादी आदिवासी साहित्यिक — श्री सूर्यभान डोंगरे | 47 |
| 12 | आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री चळवळीचे स्वरुप — डॉ. स्मिता प्र. खोंडे | 52 |
| 13 | झाडीपट्टी नाटयशारदेच्या दरबारातील प्रथितयश कलावंतांची मांदियाळी — डॉ धनराज एल खानोरकर | 57 |
| 14 | राघववेळ : एक आकलन — डॉ. नरेंद्र इश्वर घरत | 62 |
| 15 | निखाऱ्यांच्या पाऊस पाडणारा वैदर्भीय कवी : जावेद पाशा — डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज | 67 |
| 16 | वैदर्भीय कविता आणि कवी — प्रा. भोजराज व्ही. बोदेले | 73 |
| 17 | सटवाई : ग्रामीण व्यवस्थेचे धगधगते वास्तव उलगडणारा कथासंग्रह — डॉ. कैलास वानखडे | 76 |
| 18 | झाडीपट्टीतील दंडार लोकनाट्य — स्वरूप आणि चिकित्सा — डॉ. शरद जे. मेश्राम | 83 |
| 19 | गिरीश सपाटे यांची कविता : मर्मबंध ते काळोख गडद होत चाललाय... — डॉ.अशोक भक्ते | 87 |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 20 | वैदर्भीय लोकजीवनात ग्रामगीतेचे महत्व डॉ. साधना जिचकार | 92 |
| 21 | अरूणा सबाने ह्यांच्या कादंबरी लेखनातील स्त्रीवादी दृष्टिकोन कु. करूणा वसंतराव डहाके | 95 |
| 22 | माधव सरकुंडे यांच्या 'वाडा' आदिवासी कादंबरीतील समाजवास्तव डॉ. रेखा जगनाळे–मोतेवार | 99 |
| 23 | दलित- आंबेडकरी साहित्य प्रवाह: एक आकलन डॉ.निता उदेभान मेश्राम | 104 |
| 24 | अरुणा सबाने यांच्या स्त्रीवादी कादंबरीलेखनाचे स्वरुप ; वैशिष्ट्ये डॉ. मनीषा वसंतराव नलगे | 112 |
| 25 | ''ग्रामीणतेचे ज्वलंत वास्तवचित्रण रेखाटणारी कादंबरी : चारीमेरा'' प्रा. राजेंद्र बांगर | 115 |
| 26 | वैदर्भीय ग्रामीण कथासाहित्य डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण | 122 |
| 27 | ग्रामगीतेतील 'ग्रामनिर्माण' पंचक: संस्कार आणि जडण घडण प्रा. डॉ. महेंद्र द. झलके | 125 |
| 28 | वैदर्भीय साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे : व्यक्ती आणि वाङ्मय प्रा. कमलाकर एन. माहुरे | 130 |
| 29 | वैदर्भीय स्त्रीमुक्तीवादी लेखिका कुमुद पावडे यांच्या आत्मकथनाचा 'अंत:स्फोट' प्रा. अजय वा. बारसागडे | 133 |
| 30 | 'माझ्यातला कवी मरत चाललाय': एक आकलन डॉ. संजय जीवनलाल सिंगनजुडे | 137 |
| 31 | अनिल यांची सामाजिक व वैचारिक स्वरूपाची कविता प्रा. डॉ. राकेश कभे | 143 |
| 32 | वैदर्भीय ऐतिहासिक नाटके डॉ. मीनाक्षी भोयर | 149 |
| 33 | अंतर्मनाचे पदर उलगडणारी 'हराळी' डॉ. विलास गुलाबराव गजबे | 153 |
| 34 | वैदर्भीय साहित्यधारा : डॉ.प्रतिमा इंगोले हयांचे काव्यसंग्रह संदर्भात (शेतकऱ्यांच्या नारी, बाईची कहाणी, भुलाई) डॉ.विजया जितेंद्र राऊत | 158 |
| 35 | वैदर्भीय सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे यांच्या' संग्राम' आत्मचरित्राची स्त्रीवादी अंगाने चिकित्सा डॉ. अमृता डोरलीकर | 167 |
| 36 | झाडीपट्टी रंगभूमीचे वेगळेपण डॉ. माधव धोंडीबा कांडणगिरे | 171 |
| 37 | सण–उत्सवांकडे पाहण्याचा राष्ट्रसंताचा वैज्ञानिक दृष्टिकोन राहुल लक्ष्मणराव रक्षित | 175 |
| 38 | वैदर्भीय कांदबरी व कादंबरीकार प्रा. पराग मुरलीधर सपाटे | 182 |
| 39 | कुसुमावती देशपांडे : व्यक्ती आणि ललितवाङ्मय डॉ. संगीता खुरद | 188 |
| 40 | 'माणूस' या कादंबरीतील व्यक्तिरेखा : एक आस्वाद प्रा. डॉ. विनोद उत्तमराव भालेराव | 192 |
| 41 | अनिलांच्या कवितेतील प्रेमजाणिवा डॉ. अंजली मुकुंद पांडे – जोशी | 198 |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 42 | गझल सम्राट : सुरेश भट डॉ. सुधा पेशकर | 201 |
| 43 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा साहित्यावर झालेला परिणाम डॉ.पुरूषौत्तम गुनवंतराव पखाले | 204 |
| 44 | लोकशिक्षक संत गाडगेबाबा डॉ.प्रा. रिता वाळके (डंभाळे) | 207 |
| 45 | वैदर्भीय आंबेडकरवादी साहित्यिक : वामन निंबाळकर'' डॉ. भारत सुरेशराव कडबे | 210 |
| 46 | वैदर्भीय महानाट्य 'महासूर्य' राकेश चंद्रभान लोहकरे | 215 |
| 47 | वैदर्भीय कथाकार डॉ. प्रकाश खरात यांच्या 'अक्षरांची पहाट' या कथासंग्रहाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये **डॉ. सुधाकर भुयार** | 217 |
| 48 | सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' कादंबरीमधील आर्थिक जाणिवा **प्रा. डॉ. जनार्दन काटकर** | 220 |




Scanned with CamScanner

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**

Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 333 (CCCXXXIII)

ISSN : 2278-9308 December, 2021

# राघववेळ : एक आकलन

डॉ. नरेंद्र इश्वर घरत

सहायक प्राध्यापक (मराठी विभाग प्रमुख)

श्री बिंझाणी नगर महाविद्यालय,नागपूर , gharatnarendra78@gmail.com

**प्रस्तावना :—**

दलित साहित्यप्रवाहातील आजच्या पिढीचे एक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व म्हणजे नामदेव कांबळे होत. दलित जीवनाला आणि त्या जीवनातील प्रखर वास्तवाला आपल्या लेखनीने बोलके करण्याचा नामदेव कांबळे यांनी मातंग समाजातील एका जिद्दी स्त्रीची जीवनकहाणी 'राघववेळ' या कादंबरीतून व्यक्त केली आहे. नामदेव कांबळे यांनी १९९४ साली ही कादंबरी लिहिली आहे. आणि १९९५ चा 'साहित्य अकादमी पुरस्कार' ही या कादंबरीला मिळाला. पुरस्कारप्राप्त 'राघववेळ' ही कादंबरी अनेक दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे. वर्तमान जीवनात वास्तवाचा वेध घेणारी नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही नव्वदीच्या दशकातील भयान समाजवास्तवाला प्रतिबिंबित करते. कसल्याही प्रकारची लेखनपरंपरा नामदेव कांबळे यांच्या घराण्याला नव्हती. अज्ञान आणि अंध:कारात सापडलेल्या आपल्या घराला नामदेव कांबळे यांनी प्रकाशाची ज्योत दाखविली. म्हणूनच तळा—गाळातील अस्पृश्यांची जीवनव्यवस्था, वेदना तेवढ्याच परखडपणे 'राघववेळ' या कादंबरीने खऱ्या अर्थाने मांडली.

मराठी साहित्यविश्वात अपरिचित असणाऱ्या एका प्रतिभावंत आणि प्रगल्भ साहित्यिकाचा परिचय मराठी विश्वाला झाला अकादमी पुरस्कारामुळे. आपल्या लेखनविश्वात 'राघववेळ' शिवाय 'ऊनसावली' आणि 'साजरंग' या कादंबरीचीही निर्मिती त्यांनी केली आहे. भाषाशैली, निवेदन, व्यक्तिचित्रण, कथानक या सर्वच पातळ्यांवर नामदेव कांबळे यांच्या कादंबऱ्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. दलित कादंबरीच्या प्रवाहातील कलात्मक पातळी गाठणारी एक महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणून 'राघववेळ' कादंबरी विचारात घेतली आहे.

१९६० नंतर साहित्याच्या विश्वात आमूलाग्र बदल झाला. ग्रामीण—दलित साहित्याच्या प्रवाहाबरोबरच इतर साहित्यप्रवाह उदयास आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून दलित साहित्यिकांनी आपल्या जीवन वास्तवाला लेखनीचा विषय बनविले. मराठी साहित्याच्या विश्वातील नव्वदीच्या दशकातील एक कादंबरीकार म्हणजे 'नामदेव कांबळे' होत. नामदेव कांबळे यांच्या समकालीन लेखकांच्या लेखनात नामदेव कांबळे यांचे लेखन आशयसंपन्न आणि प्रत्ययकारी ठरल्यानेच त्यांच्या कादंबरीस अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाल्याचे मान्य करावे लागते. आपला समाज आणि त्या समाजातील विविध वृत्ती—प्रवृत्तींना केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली 'राघववेळ' ही कांदबरी अनेक प्रकारच्या माणसांचे मनोवेधक दर्शन घडविते हे सांगताच डॉ. ज्ञानेश्वर थोरात म्हणतात की, ''राघववेळ' या कादंबरीत काही ठळक जातीची माणसे दिसतात. जगदीश सरपंच, पांडुरंग पाटील, गोपाळराव देशमुख, जाधव आणि वाणी, मारवाडी, धनगर, लिंगायत, माळी, कलाल, न्हावी, फकीर, महार, मांग, चांभार इ. जातीची माणसे कादंबरीतून दिसतात.''[१] 'राघववेळ' या कादंबरीतून घडणाऱ्या विविध जाती, जमातीच्या माणसांना 'राघववेळ' कादंबरी नामदेव कांबळे यांनी कसे एकत्रित विणले आहे हे सांगितले आहे. 'राघववेळ' या कादंबरीच्या कथानकाला विचारात घेऊन कादंबरीच्या अंतरंगाचा विचार करता येईल.

**'राघववेळ' चे कथानक :—**

'राघववेळ' कादंबरीची कथा ही विधवा वालंबी मातंग स्त्रीच्या जीवनावर आधारलेली आहे. दलित कादंबरीत अत्यंत सकस समजली जाणारी ही कादंबरी एका मातंग समाजातील जिद्दी स्त्रीची जीवनकहाणी आहे. या कादंबरीत या स्त्रीला किती महत्त्वाचे स्थान आहे हे सांगताना स्वत: लेखक आपल्या मनोगतातून सांगतात की, ''या कहाणीतील वालंबी तेवढी खरी, बाकी संगळेच निमित्तमात्र, कारण वालंबी नसती तर कशालाच काही अर्थ नसता कदाचित.''[२] वरील मनोगतातून नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ' या कादंबरीचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. या कादंबरीमध्ये मुख्य नायिका वालंबी हीच आहे. तिचा जीवनसंघर्ष हाच या कादंबरीचा आत्मा आहे, असे दिसून येते. नामदेव कांबळे यांनी वालंबी ही स्त्रीच कादंबरीच्या केंद्रस्थानी असल्याचे सांगितले आहे.



Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 333 (CCCXXXIII)
ISSN : 2278-9308
December, 2021

या कादंबरीचे कथानक सरळ रेषेत जाणारे आहे. मांग समाजात जन्माला आलेली ही स्त्री अकालीच विधवा झालेली असून तिला मुले—मुली आहेत. आपल्या मुलांनी शिकावे परंतु पारंपरिक उद्योगात येऊ नये, अशी तिची मनोमन इच्छा असते. जातीने जरी अस्पृश्य असली तरी विचाराने आणि संस्काराने ही स्त्री सुधारणावादी विचारांचा अंगिकार करणारी आहे, असे वाटते. परंपरा बाजूला सारून आधुनिकतेचा स्वीकार करण्यासाठी धडपडणारी ही स्त्री बदलत्या दलित स्त्री जीवनसचे प्रतिनिधित्व करताना दिसते. या कादंबरीचे कथानक संघर्षमय स्वरूपाचे आहे. मांग समाजात जन्मलेल्या आणि विधवेचे जीवन जगणाऱ्या, आपल्या मुला—बाळांच्या सुखासाठी धडपडणाऱ्या स्त्रीचे चित्रण या कादंबरीतून केलेले आहे. त्याचबरोबर स्वत:शी संवाद साधून समाजाकडे स्वच्छ दृष्टीने पाहणाऱ्या एका धीरोदात्त स्त्रीचे चित्रण आहे.

गावगाड्याच्या आश्रयाने आपल्याला जगावे लागते, याचे वालंबीला पूर्ण भान आहे. नवऱ्याचे छत्र हरवल्यानंतर रघुला मोठ्या कष्टाने शिकवण्याची तिची जिद्द असते. कुटुंबाचे ओझे वाहतांना तिला असंख्य वेदना होतात. आपले दु:ख तिने समर्थपणे सहन केलेले असले तरी जातिव्यवस्थेच्या किंवा वर्णव्यवस्थेच्या चक्रव्यूहात अडकलेल्या दुर्दैवी स्त्रीची कर्मकथा या कादंबरीत चित्रित केलेली आहे. भूक आणि वासना यावर नियंत्रण ठेवून नैतिक जीवन जगण्याची असामान्य क्षमता तिच्यामध्ये आहे. फडे करून ती भाकरीच्या मोबदल्यात घरोघरी देते. हाताला मिळेल ती कामे करते.

रघुच्या पाचवी ते दहावीपर्यंतच्या पाच—सहा वर्षांचा खडतर प्रवास या कादंबरीतून वर्णन केलेला आहे. त्यालाही ज्ञानाची भूक असते. फी साठी पैसे मिळत नाहीत. शाळेत 'मांगाचा पोरगा' म्हणून सापत्न वागणूक मिळते. तो हुशार, संयमी आणि विचारी आहे. शाळेतून घरी आला की, आईच्या कामना मदत करतो. दारिद्र्याचे चटके भोगत—भोगत तो मॅट्रीक पास होतो.

या कादंबरीत वालंबीबरोबर तिच्या दीराच्या कुटुंबाचेही चित्रण केलेले आहे. पायरू मजुरी करून जीवन जगतो. त्याची पत्नी हरणीही कष्टाची कामे करते. भावजयीला आधाराचं कोणीही नाही म्हणून वालंबीच्या सुख—दु:खाच्या प्रसंगी तो धावून येतो. कौशी, वालंबीची मुलगी तिचं बालपण दारिद्र्यातच गेलं. कळत्या वयापासून ती मोलमजुरीच्या कामात आईला मदत करू लागली. शिक्षणाच्या बाबतीत मात्र तिची उपेक्षा होते. अजून मातंग समाजात स्त्रीला दुय्यम स्थान आहे. विटभट्टीवर काम करणारी कौसा अनेकांच्या डोळ्यात भरत होती. तिच्या लग्नाची चिंता वालंबीला लागली होती. डोगं किन्हीच्या यादवबरोबर लग्न होऊन ती मिटते. तिचं नवऱ्यावर खूप प्रेम असतं, मात्र तिची सासू गजरी पंडितरावांशी अनैतिक संबंध ठेवते. सुनेनेही असेच वागावे असे तिला वाटते. भुजंगरावाच्या घरी कांदे टाकायला एकटीलाच पाठवते. भुजंगराव तिच्यावर अन्याय व अत्याचार करतो. घडलेला हा प्रसंग ती कोणालाही सांगत नाही. पुढे कसोशीने आपले चारित्र्य जपण्याचा प्रयत्न करणारी वालंबी नामदेव कांबळे यांनी या कादंबरीत चित्रित केलेली आहे.

यादव हा सरळमार्गाने कष्ट करीत जगणारा कोसाचा नवरा. त्याचे कोसावर प्रेम असते. एकत्र कुटुंबाचा भार तो उचलतो. त्याच्या स्वत:च्या स्वतंत्र अशा काहीच गरजा नसतात. सलगडी म्हणून तो दुसऱ्याच्या शेतावर काम करतो. आपली आई कौसासी वैरभावाने का वागते? याचा लवकर उलगडा त्याला होत नाही. त्याने तो अस्वस्थ असतो. मात्र वास्तव परिस्थिती कळल्यावर तो विचारपूर्वक वागतो. त्याचा बाप त्याला वेगळा प्रपंच करायला लावतो. सुभाना तसा सरळ, सोशिक स्वभावाचा, बायको अनैतिक वागते हे माहीत असूनही तो काहीच करीत नाही. गजरीच्या खेळापुढे तो नुसता हतबल होऊन वागतो.

जगदीश सरपंच, पांडुरंग पाटील, गोपाळराव देशमुख ही गावगाड्याच्या केंद्रस्थानी असलेली माणसे गावात असतात. त्यांचेच गावावर वर्चस्व व सत्ता असते. पाटील, देशमुख, जाधव, वाणी, धनगर, सुतार, महार, मांग, मारवाडी, कलाल, माळी, न्हावी, फकीर, वंजारी, चांभार ही वेगवेगळ्या जाती—धर्मांची माणसे एकत्र नांदतात. त्यांचे परस्पर संबंध सामूहिक पातळीवर अतिशय चांगले आहेत. प्रत्येक जातीचे एक स्वतंत्र वर्तुळ आहे. त्यात राहूनच ते व्यवहार करतात. मात्र या विविध जाती—मताजींच्या माणसांमध्ये एक प्रकारची समूहभावना आहे. ती नामदेव कांबळे यांनी नेमकेपणाने 'राघववेळ' मधून मांडली आहे. एकंदरीत आजच्या ग्रामीण जीवनाच्या वर्तमान घडामोडीचे चित्र कांबळे यांनी या कादंबरीत मांडले आहे.



Scanned with CamScanner

'राघववेळ' या कादंबरीतील पात्रचित्रण :—

'राघववेळ' या नामदेव कांबळे यांच्या कादंबरीत खालील व्यक्तिरेखा आढळून येतात.

१)वालंबी :—

वालंबी ही रघूची आई असते. रघूचे वडील (कळणू) यांच्या निधनानंतर प्रपंचाचा भार वालंबीवर पडतो. वालंबी ही कष्टाळू, प्रमाणिक स्त्री आहे. रघूच्या शिक्षणासाठी ती खूप खस्ता खाते. वालंबी रघू, सीताराम, कौसा ह्या मुलांचा प्रतिपाळ चांगला करते. त्यांना जगवणं हीच वालंबीच्या जगण्याची प्रेरणा आहे. दसऱ्याच्या दिवशी वालंबी, रघू, सीताराम, कौसा, पायरू व हरणीचे (पत्नी) दर्शन घेतले, पायरूने वालंबीचे दर्शन घेतले. मोठ्या माणसांचा मान राखावा ही शिकवण वालंबीने मुलांना दिली होती. कौसाचे लग्न डोंगर किन्हीच्या सुभाना इंगळेशी ठरते. यथावकाश लग्नही होते. लग्नाच्या दिवशी वालंबीच्या मनात येते. आपण नावाचीच वरमाय, ''खरी वरमाय हरणीचं देवानं आपल्या कपाळाले कुकुंमागी नसलं शेण पुसलं तर कशाले पऱ्हयाव्हत व्हती जिवाची''[३] आपण विधवा आहोत कपाळावर मळवट भरू शकत नाही याचं दुःख वालंबीला होते. मुलाच्या औषधोपचारासाठी यादव पाटलाकडून तीस रूपये मागते पण त्याबदल्यात तिची मानहानीच होते. वालंबी वडाचे, पळसाचे पाने आणून पत्रावळी बनून देण्याचे काम करते.

२)रघू :—

रघू हा वालंबीचा थोरला मुलगा असतो. त्याला शाळेविषयी आवड असून तो रोज शाळेत जातो व नियमितपणे अभ्यास करतो. शिक्षणामुळे माणसाची प्रगती होते, आपला विकास होतो, हे तो जाणून होता. आईला घरकामात, पाणी आणण्यास रघू मदत करतो. श्रावण महिन्यात शेवटच्या सोमवारी गावाच्या महादेवाच्या मंदिरासमोर लाखोलीची पंगत होती. रघू, सीताराम, पायरू त्या लाखोलीच्या पंगतीत गेले. पण तिथे मांग म्हणून अडवून त्यांना लाकडे फोडली तरच जेवायला पंगतीत बसा असे म्हटल्या गेले. तेव्हा रघूला खूप राग आला. चंद्रग्रहणाच्या वेळी रघू गावात 'दे दाण सुटे गिऱ्हाण' म्हणून दान मागत होता. रघूला वाटते की आपण देशमुख, सरपंच ह्या वरिष्ठ मंडळी यांचे म्हणणे ऐकतो. त्यांनी सांगितलेली कामे करतो. तरीसुद्धा हे लोक आपल्याला जनावरांपेक्षाही हीन दर्जाचे लेखतात. आपण भिक मागतो, अशा मागितल्यामुळे आपण मागे राहिलो असे विचार रघूच्या मनात येतो. अशी भिक आपण मोठे झाल्यावर मागायची नाही हे विचार त्याच्या मनात येतात.

३)कौसा :—

कौसा वालंबीची मुलगी असून वालंबीने सांगितलेली सर्व कामे न कुरबुरता करते. शेतात वालंबीबरोबर जाऊन तिच्याबरोबर काम करते. घरी राहित्यावर साली कुटून ठेवते. दिवाळीच्या दिवशी भावांना उटणे, साबण लावून आंघोळ घालीत असे व नंतर ओवाळीत असे. आईच्या शब्दाबाहेर कौसा नसते. विटभट्टीच्या कामावर कौसा जात असे. पगार झाल्यावर वालंबीने कौसासाठी पावडर डबा, लुगडे, झंपरचा कपडा, काजळाची डबी घेतली. कौसाचे लग्न डोंगर किन्हीचा सुभाना यादवच्या मुलाशी करून देते. सासू तिला घरकामात त्रासच देत असते. कौसा हे सहन करते. कौसाही समजूतदार असते. पाटलांच्या घरी घरकामासाठी ती जाते तेव्हा भुजंगराव पाटलांचा मुलगा तिचा विनयभंग करतो.

४)गोपाळराव देशमुख :—

हा चारित्र्यहीन माणूस असून स्त्रियांना ज्वारी देतो, काम देतो व मदत करतो म्हणून घरी बोलावतो. त्यांच्याशी गैरवर्तन करतो. पायरूची पत्नी हरणी हिच्याशीही त्याने असे गैरवर्तन केलेले असते.

५)नारायण :—

धनगराचा नारायण यांचेकडून श्रावण महिन्यात महादेवाच्या मंदिरात जेवणावळ असते, त्यासाठी लाकडे फोडायला काही मांग लोकांना बोलवितो. काही मांग लोक लाकडे फोडतात. ज्यादिवशी जेवणावळ असते तेव्हा सर्व मांग जेवायला येतात. तेव्हा नारायण म्हणतो, ज्यांनी लाकडे फोडली त्यांनीच जेवायला बसा असे म्हटल्यावर रघूला खूप वाईट वाटते. आपला अपमान झाल्यासारखे वाटते. आपण भिकाऱ्यासारखे जेवायला जातो याचे त्याला वाईट वाटते.

६)पायरू :—

पायरू हा 'राघववेळ' या कादंबरीत वालंबीचा दीर आहे. ककणूच्या मृत्यूनंतर वालंबीच्या मुलाबाळांकडे तो लक्ष देत असतो. पावसाच्या झडीत जेव्हा पायरू देशमुखांच्या घरी ज्वारी मागण्यास



Scanned with CamScanner

जातो. तेव्हा तो भाबीला पाठवून दे म्हणतो ते पायरूच्या मनात येते. ''पोटाची आग लय वस्टी काय बी कराया लागते माणसाले ती सोताची भूक इसरता आली अस्ती आपल्याले बायकोलेबी पण चिल्यापिल्याची भूक इसरायचेत.''[४] त्यावरून पोटाची आग विझण्यासाठी माणसाला काय करावे लागते, हे कळते. पायरूने आपल्या बायकोस देशमुखांच्या वासनेचे शिकार बनवले. हरणीने आणलेली ज्वारी वालंबीस देण्यास सांगतो. पण हरणी देत नाही. चहासाठी तो गूळ आणण्यास बाहेर पडला. वाण्याच्या दुकानात गूळ घेतला तर वाण्याने आपली म्हैस मेली. तिला घेऊन जा म्हणून सांगितले. पायरू त्याचे मित्र शिवऱ्या, बुग्या म्हैस नेण्यास मदत करतो. रघूला बोलाविले. त्यालाही म्हशीच्या मांसाचा वाटा दिला.

पायरू आपल्या भावाच्या मुलाबाळांकडे सहानुभूतीचा आधार देतो. कौसा विटभट्टीवर कामाला जाते. नटूनथटून जाते हे पाहताच पायरू तिला म्हणतो, ''पोरगी भट्टीवर जाते मग असं सायबावानी झाकपाक काहून राहते बा! काय करावे लागते. गरिबाले आसा शौकनाक पचलं तसं खावं आणि सोभलं तसं लेवाव मानसानं.''[५]

अशाप्रकारे या कादंबरीतील मुख्य स्त्रीपात्र वालंबी असून गौण पात्र तिची मुले रघू, सीताराम, कौसा, गोपाळराव देशमुख, पायरू, सोनेकर सर आहेत.

**'राघववेळ' कादंबरीतील समाजदर्शन :—**

'राघववेळ' ही मातंग समाजाची, विधवा वालंबीची व शिकून मोठा झालेला व कुटुंबाला सावरणारा रघूची कथा सांगणारी कादंबरी आहे. वास्तवाशी नाते जोडताना समाज, संदर्भ, घटनाप्रसंग जर विचार घेतले तर ही कादंबरी म्हणजे लेखक म्हणतात त्याप्रमाणे ''वास्तवता कादंबरीच्या अनेक घटकांच्या बाबतीत संभवते व अपेक्षित असते. कथानक, व्यक्ती, संवाद, भाषा, वातावरण यापैकी प्रत्येकच घटकाची वास्तवता तपासून पाहण्यासारखी आहे.''[६] कादंबरीतील वास्तवता कोणत्याही एका घटकावर अवलंबून नसते तर ती विविध घटकांतून तपासून पहावी लागते.

या कादंबरीतील मातंग समाज गावातील गोपाळराव, पांडुरंग पाटील, भुजंगा ह्या सवर्णांच्या मागे मागे जाणारा आहे. हा समाज परावलंबी असल्यामुळे सवर्ण समाजातील लोक त्यांचा फायदा घेतात.

पायलीभर ज्वारीसाठी 'आग मोडेस्तोर' काम करणारी ग्रहण मागणारी व भट्टीवर काम करणारी कौसा आली की, किसना भुजंगा येताच धान्य, पैसा यासाठी पाटलाकडून 'खोपा झटकून घेणारी' व सुनेत्राला त्या मार्गाने लावणारी 'गजरी' मुलासोबत पळून जाणारी 'लिला' हे सगळच समाजात स्वाभाविक वाटत त्यामुळे ही कादंबरी वास्तव वाटते. लेखकाने कथानकाची मांडणी कल्पकतेनं व कलात्मक पद्धतीने केली.

सीताराम व लिला यांचा जंगलातील प्रसंग, रघूच्या स्वप्नात 'साप' दिसनं व सर्पदंशानं पायरूचा मृत्यू काल्पनिक वाटतो. पायरूचं वाहून जाणं, लोंडकं येणे, पाटलानं सांभाळताना व उपचाराशिवाय गंभीर आजाराशिवाय वालंबीचा मृत्यू काल्पनिक वाटतो. पण कादंबरीतील बऱ्याच घटना, प्रसंगात भाषा, रीतिरिवाज, संवाद, वाद, प्रवृत्ती, विकृती वास्तवच वाटतात.

अशाप्रकारे 'राघववेळ' या कादंबरीतून दलित समाजाच्या जीवनव्यथेचे प्रत्ययकारी चित्रण कादंबरीकार नामदेव कांबळे यांनी रेखाटले आहे.

**'राघववेळ' या कादंबरीतील वातावरण :—**

'राघववेळ' या कादंबरीतील वातावरण यथार्थ आहे. पुढील पावसाळ्याचे वर्णन पहा : ''पावसाने फणा उभारला. आभाळ ढगांनी भरून गेले. काजळागत काळकुट्ट झाले. विजा कडाडू लागल्या. ढग गर्जु लागले. दिवसरात्र पाऊस पडू लागला''[७] पावसाळी वातावरणाचे चित्रण येथे नामदेव कांबळेंनी केले आहे. झडीच्या दिवसात गरीब लोकांचे अतिशय हाल होतात. कामे मिळत नाहीत. घरी बसून राहावे लागते. प्रसंगी उपाशी रहावे लागते. ''लवरा असता तरी ही पऱ्हा व्हती कां? निखळ भाजीच खा लागली आस्ती कां लेकरायले? काहीच नसतं का घरात? नसतं बी पण नवऱ्यानं धा घराले ठोकरा मारल्या आसत्या. काही ना काही आणून त्याह्याच्या पुढी ठुलं आस्तं.''[८]

वालंबीच्या मनात नवऱ्याविषीच्या भावना जागृत होतात. गरीब परिस्थितीमुळे, पावसाच्या झडीमुळे मुलांना फक्त अंबाडीचीच भाजी खावी लागते. कळणू मात्र गावात जावून काहीना काही आणून मुलांना खायला देते. गरीब परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीपुढे माणसाचे काहीच चालत नाही.



Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 333 (CCCXXXIII)
ISSN : 2278-9308
December, 2021

मांगाच्या मागची गडबड खऱ्या अर्थाने कधीही न संपणारी असते.

'राघववेळ' या कादंबरीतील वाक्प्रचार :—

घोड्याच्या पोटाला बांधणे, झाड पाहून अंगावर येणे, कंबर बांधणे, जीव टांगणीला लागणे, पिसं लागणे, मुतात मासळ्या मारणे, ताकालातूर लागून देणे, तोंडाला टाचा घालणे, भ्झग देणे असे अनेक वाक्प्रचार कांबळे यांनी नेमका आशय दर्शविण्यासाठी वापरले आहेत. अल्पाक्षरत्व हेही वैशिष्ट्य या कादंबरीत जाणवते.

'राघववेळ' या कादंबरीतील म्हणी :—

'राघववेळ' या कादंबरीतील म्हणींचा वापर चपखलपणे केला आहे. अनेक वेळा बोलताना यमक साधण्याचा प्रयत्न केला आहे.

१)घरोघरी मातीच्याच चुली
२)शिताहून भाताची परीक्षा
३)बारभाई खोती आन् बाफन्या लागेना हाती
४) खायाले भागो भागो, आन् कामाले आग लागो
५)येळंला केळ, नवसले सिताफळ
६)पचलं तरं खावावं आन् सोभलं तर लेवावं माणसानं
७)पळायाना पोसाय, फुकट डोळे वासाय
८)गरीब गाय आन् पोटात पाय
९)उगीच वेडी व्हऊन पेडा नोको खाऊ
१०)वेळ न वकत आन् कोळमं काखत

निष्कर्ष :—

१)नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ' या कादंबरीतून मातंग समाज सगळ्याच पैलूतून उभा केला आहे. हत्यांचे परिश्रम त्यांच्या कादंबऱ्यांना दलितेवर व दलित वाङ्मयात स्थान देवू शकेल.
२)'राघववेळ' या कादंबरीतील संवादात जिवंतपणा आणि चित्रमयता आहे. त्यांनी वऱ्हाडी व मातंगी बोली भाषेचा वापर केल्याने संवादात गोडवा आला आहे.
३)नामदेव कांबळे प्रस्तुत कादंबरीत निवेदनात संवाद, स्वगते, पात्र व प्रसंग हे माध्यम निवडतात. पण स्वगतावर ते अधिक भर देताना दिसतात.
४)प्रसंगात गतिमानता आणत असताना प्रस्तुत कादंबरीत नामदेव कांबळे महत्त्वाचे प्रसंगच संक्षिप्त करून टाकतात. विशेषत: शृंगारिक प्रसंग फारच आटोपशीर करतात.
५)नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' या कादंबरीत बरीच वास्तविकता आहे. त्यांनी वास्तव व कल्पना यांचा समन्वय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे.
६)'राघववेळ' या कादंबरीत नामदवे कांबळे काव्यात्मक भाषेत शृंगाराचे वर्णन फारच ढिसाळपणे करतात. उदा. पडदा उचलणे, गोलपट सुरू करणे, 'तटतट' हा शब्द अनेक वेळा या कादंबरीत दिसतो.

संदर्भग्रंथसूची :-

१)डॉ. थोरात ज्ञानेश्वर, ग्रंथवेध, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबऱ्या, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर,पृ. ६४.
२)कांबळे नामदेव, राघववेळ, देशमुख आणि कंपनी पब्लिकेशन, पुणे, आवृत्ती ९ वी, २००८ मनोगत, पृ. २९.
३)तत्रैव, पृ. ५९.
४)तत्रैव, पृ. ८२.
५)तत्रैव, पृ. ९४.
६)तत्रैव, मनोगत, पृ. २७.
७)तत्रैव, पृ. १०२.
८)तत्रैव, पृ. ११८.



Scanned with CamScanner